# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड** **दिनांक १५/०७/२०१८**

## १ ) वाळु चोरी

**देगलुर :-** दिनांक १३.०७.२०१८ रोजीचे २०.०० वा. चे सुमारास तमलुर रोडवर, ता.देगलुर जि.नांदेड येथे यातील आरोपीतांनी संगनमत करुन आपले ट्रक क्रं.ए.पी. २५/पी.बी.९००९ अंदाजे किंमत १४,००,०००/- रुपये मध्ये ०८ ब्रास रेती अंदाजे किंमती २४,०००/- रुपये असा एकुण १४,२४,०००/- रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने मिळुन आले, वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/९३५ शरीफ खान हाबीब खान पठाण, ने.पो.स्टे.देगलुर** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे.देगलुर** गुरनं २९७/२०१८ कलम ३७९, ३४ भादवीसह ४८ (७), ४८ (८), महा.जमिनी व महसुल अधिनियम १९६६ कायदयाप्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/२२४१ तोरणे, मो.नं. ०२४६३-२५५१००** हे करीत आहेत.

## २) खुनाचा प्रयत्न :-

**वजिराबाद :-** दिनांक १३.०७.२०१८ रोजी चे २२.०० वा. चे गोवर्धन घाट पुलाचे चढावर, नांदेड येथे यातील फिर्यादी हा नमुद ठिकाणी पत्नीचा फोन आला म्हणुन गाडी साईड ला लावुन बोलत असतांना यातील आरोपी हा पाठी मागुन येवुन फिर्यादीस म्हणाला की, तुझ्या वडीलांचे राहीलेले पैसे दे या कारणा वरुन खंजराने उजव्या बाजुला पोटामध्ये मारुन गंभीर जखमी करुन जिवे मारण्याचा प्रयत्न केला. वगैरे **फिर्यादी लक्ष्मण किशनराव बरबडे, वय ३२ वर्षे व्यवसाय मोबाईल दुरुस्ती रा.गुरुवार बाजार सिडको, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पो.स्टे.वजिराबाद** गुरनं १९३/२०१८ कलम ३०७, भादंवि प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोनि/बडे, मो.क्र. ९९२३७२५८८३** हे करीत आहेत.

## ३) हयगयीने वाहान चालवुन मरणास कारणीभुत (अपघात) :-

**उमरी :-** दिनांक ०९.०७.२०१८ रोजी चे १७.०० वा. चे सुमारास वलीसाहब दर्गा समोर उमरी ते भोकर जाणारे रोडवर, ता.उमरी जि.नांदेड येथे यातील **मयत नामे गणपत सोनबा सोनकांबळे, वय ५५ वर्ष रा.सोमठाणा, ता.उमरी जि.नांदेड** हा मोटार सायकल बाजुला लावुन ओळखीचे इसमास बोलत थांबला असतांना यातील अज्ञात आरोपीने ऑपे ॲटो क्रमांक एम.एच.२६/पी. ५६६७ चे चालकाने आपले वाहान हयगय व निष्काळजीपणाने भरधाव वेगात चालवुन मयतास जोराची धडक दिल्याने त्यास उपचारकामी सरकारी दवाखाना नांदेड येथे शरीक केले असता उपचारा दरम्यान मरण पावला. वगैरे **फिर्यादी सुनिल गणपत सोनकांबळे, वय २९ वर्षे व्यवसाय शिक्षण रा.सोमठाणा, ता.उमरी जि.नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पो.स्टे.उमरी** गुरन ११८/२०१८ कलम ३०४ (अ), २७९, ३३७, ३३८, भादंवि कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोनि/एम.एम.कारेगावकर, मो.नं. ७७१९००२९२९** हे करीत आहेत.

## ४) विवाहितेचा छळ :-

**अर्धापुर :-** दिनांक ०५.०५.२०१५ पासुन ते दि.१४.०७.२०१८ चे १२.०० वा. चे दरम्यान खुबा कॉलनी अर्धापुर, जि.नांदेड येथे यातील नमुद आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादीबाईचे माहेरी जावुन २,००,०००/- रुपये ची व्यवस्था केली की नाही म्हणुन तिस थापड-बुक्याने मारहान करुन, शिवीगाळ करुन, मानसिक व शारिरीक छळ करुन, त्याचे दुसरे लग्न करतो म्हणुन तिस घरातुन हाकलुन दिले व जिवे मारण्याची धमकी दिली व ०३ वर्षाचे मुलीला घेवुन गेले. वगैरे **२८ वर्षीय वय असलेल्या महिला फिर्यादीने** दिलेल्या फिर्यादीवरुन **पो.स्टे.अर्धापुर** गुरनं. १५०/२०१८ कलम ४९८(अ), ४५२, ३२३, ५०४, ५०६, ३४ भादविप्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोउपनि/पानपट्टे, मो.क्र. ९६३७५६८७९१** हे करीत आहेत.

## ५) कल्याण नावाचा मटका खेळत असतांना मिळुण आले :-

**अ) देगलुर :-** दिनांक १४.०७.२०१८ रोजी चे १५.३० वा. चे सुमारास बालाजी झेंडया समोर देगलर रोडवर, जि.नांदेड येथे यातील नमुद आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या लोकांकडुन पैसे घेवुन आकडयावर पैसे लावुन स्वतःचे फायदयासाठी कल्याण नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी १,१००/- रुपयाचे मालासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/१९८४ उत्तम रामराव सुकनुरे, ने.पो.स्टे.देगलुर** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे.देगलुर** गुरन. २९८/२०१८ कलम १२ (अ) मजुका अन्वये गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/१२२८ गायकवाड, मो.क्र. ०२४६३-२५५१००** हे करीत आहेत.

**ब) इतवारा :-** दिनांक १४.०७.२०१८ रोजी चे १६.२० वा. चे सुमारास कुलदीप भद्रे यांचे घरासमोर सिध्दार्थनगर सार्वजनिक रोडवर, नांदेड येथे यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या लोकांनकडुन पैसे घेवुन स्वतःचे फायदयासाठी मटका जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी १,६८०/- रुपयाचे मालासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोउपनि/नंदकिशोर पि.पंडीतराव सोळुंके, ने.पो.स्टे.इतवारा** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे.इतवारा** गुरन. २२३/२०१८ कलम १२ (अ) मजुका अन्वये गुन्हा दाखल असुन **तपास पोना/२४४२ नलबे, मो.क्र. ०२४६२-२३६५१०** हे करीत आहेत.

## ६) मिलन नावाचा जुगार खेळत असतांना मिळुण आले :-

**इतवारा :-** दिनांक १४.०७.२०१८ रोजी चे १६.२० वा. चे सुमारास सिध्दार्थनगर सार्वजनिक रोडवर, नांदेड येथे यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या लोकांनकडुन पैसे घेवुन स्वतःचे फायदयासाठी मिलन नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी १,१६०/- रुपयाचे मालासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोना/२४४२ शंकर पि.गणपती नलबे, ने.पो.स्टे.इतवारा** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे.इतवारा** गुरन. २२२/२०१८ कलम १२ (अ) मजुका अन्वये गुन्हा दाखल असुन **तपास पोना/१९९१ वाकडे, मो.क्र. ०२४६२-२३६५१०** हे करीत आहेत.

## ७) बेकायदेशिररित्या विदेशी दारु बाळगुन मिळुन आला :-

**मरखेल :-** दिनांक १४.०७.२०१८ चे १८.३० वा. चे सुमारास मरखेल बसस्टँड, ता.देगलुर जि.नांदेड येथे यातील नमुद आरोपीने विना परवाना बेकायदेशिररित्या विदेशी दारुचे १८० एम.एल. च्या ४० शिलबंद बॉटल अंदाजे किंमत ४,८००/- रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वैगेरे **फिर्यादी पोकॉ/२८१ रविंद्र हानमंतराव भुळे, ने.पो.स्टे.मरखेल** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे.मरखेल** गुरन ११२/२०१८ कलम ६५ (ई), मुप्रोका प्रमाणे गन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/वाघमारे, मो.क्र. ०२४६३-२६२२३३** हे करीत आहेत.

## ८) बेकायदेशिररित्या देशी दारु बाळगुन मिळुन आला :-

**अर्धापुर :-** दिनांक १४.०७.२०१८ चे १८.१० वा. चे सुमारास अर्धापुर बायपास चौरस्त्याजवळ अर्धापुर, जि.नांदेड येथे यातील नमुद आरोपीने विना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारु भिंगरी संत्राचे १८० एम.एल. च्या ९६ शिलबंद बॉटल अंदाजे किंमत ४,९९२/- रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वैगेरे **फिर्यादी पोहेकॉ/१५३ हेमंत दंतोपंत देशपांडे, ने.पो.स्टे.अर्धापुर** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे.अर्धापुर** गुरन १५१/२०१८ कलम ६५ (ई), मुप्रोका प्रमाणे गन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/पानपट्टे, मो.क्र. ९६३७५६८७९१** हे करीत आहेत.

## ९) गळफास घेवुन मृत्यु :-

**अ) किनवट :-** दिनांक १४.०७.२०१८ रोजी चे ०१.०० ते ०५.०० वा.चे सुमारास वेळ नक्की नाही मयताचे घरी मौ.बोधडी (खु), ता.किनवट जि.नांदेड येथे यातील **मयत नामे आडेल्लु तुकाराम बिडवाळ, वय ४५ वर्ष व्यवसाय शेती रा.बोधडी (खु), ता.किनवट जि.नांदेड** हा कर्जास कंटाळुन स्वतःचे घरातील खोलीत तुळईस दोरीने गळफास घेवुन मरण पावला. वगैरे **खबर देणार मनोहर तुकाराम बिडवाळ, वय ३९ वर्षे व्यवसाय शेती रा.बोधडी (खु), ता.किनवट जि.नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे.किनवट** आ.मृ. २१/२०१८ कलम १७४ सिआरपीसी प्रमाणे आ. मृ. दाखल असुन **तपास पोहेकॉ/१८०५ बालासाहेब पांढरे , मो.क्र. ७७४५००१८०५** हे करीत आहेत.

**ब) उमरी :-** दिनांक १४.०७.२०१८ रोजी चे ०९.०० वा.चे सुमारास व्यंकटेशनगर मयताचे राहते घरी उमरी, जि.नांदेड येथे यातील **मयत नामे ऋतुजा अर्जून शिंदे , वय १८ वर्ष रा.व्यंकटेशनगर उमरी, जि.नांदेड** ही मानिाक तनावात येवुन स्वतःचे घरातील खोलीत पंख्याला ओडणीने गळफास घेवुन मरण पावली. वगैरे **खबर देणार माधव जळबाजी शिंदे, वय ४५ वर्षे व्यवसाय नौकरी रा.व्यंकटेशनगर उमरी, जि.नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे.उमरी** आ.मृ. ३२/२०१८ कलम १७४ सिआरपीसी प्रमाणे आ. मृ. दाखल असुन **तपास पोउपनि/डी.पी.शिंदे , मो.क्र. ९०९६९५५९१२** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधीक्षक कार्यालय,नांदेड
फोन नंबर ०२४६२-२४४४७४.